महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९३ वे | दिनांक : २७/०३/२०२६ | वार : शुकरुवार

## छत्रपती संभाजीनगरातल्या पेट्रोल पंपांवर तोबा गर्दी, दुचाकीला फक्त २०० चे तर चार चाकीला २००० चे पेट्रोल मिळणार



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात लॉकडाऊन लागू होणार असल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरताच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची अक्षरशः झुंबड उडाली आहे. 'उद्या पेट्रोल मिळणार नाही' या भीतीने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी रांगा लावल्यात. शहरातील सर्वच पेट्रोल पंपांवर दोन दिवसांपासून लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. या अचानक वाढलेल्या गर्दीमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पंपावर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने सांगितले, "इंधनाचा कोणताही तुटवडा नाही, पण लोक अफवांवर विश्वास ठेवून एकाच वेळी गर्दी करत आहेत. त्यामुळे व्यवस्थापन करणे कठीण जात आहे."


दुसरीकडे तेल कंपन्यांनी आता ॲडव्हान्स रक्कम घेणे सुरू केले आहे. त्यामुळेही पेट्रोल उशिरा येत असल्याचे समजते. या साऱ्या गोंधळामुळे नागरिकांमध्ये मात्र संतापाचे वातावरण दिसून आले. एका वाहनधारकाने प्रतिक्रिया देताना म्हटले, "सरकारने आधी स्पष्ट माहिती द्यायला हवी. अफवा पसरतात कारण अधिकृत माहिती वेळेवर मिळत नाही." तर दुसऱ्या एका नागरिकाने सांगितले की, "आम्हाला खात्री नाही उद्या काय होईल, म्हणून आजच पेट्रोल भरून घेतोय." एकंदर पॅनिक स्थिती निर्माण झालीय. या ग्राउंड रिपोर्टमधून जाणून घेऊयात नेमकी काय परिस्थिती आहे ते...

तेल कंपन्यांनी व्यवहाराची पद्धत बदलली आहे. यापूर्वी पेट्रोल पंपचालक आधी तेल घ्यायचे. त्यानंतर पैशाचा भरणा होत असे. मात्र, आता अमेरिका-इराण युद्ध सुरू झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर इंधन प्रश्न निर्माण झाला. हे पाहता तेल कंपन्यांनी ॲडव्हान्स रक्कम घेणे सुरू केले. मात्र, पेट्रोल पंपचालक ॲडव्हान्स रक्कम देत नाहीत. त्यामुळे त्यांना पेट्रोल मिळत नसल्याचे समोर आले आहे. बहुतांश पंपचालक उशिरा पेमेंट देत आहेत. त्यामुळे सर्वांनाच उशिरा इंधन मिळत आहे. याचा फटका वाहनधारकांना बसत असून, पेट्रोल पंपावर रांगा लागल्याचे चित्र आहे.एका वृद्ध नागरिकाने सांगितले की, 'गेली दोन तास झाले मी या रांगेत उभा आहे. इथे लोक गाड्यात पेट्रोल असूनसुद्धा पेट्रोल भरायला आले आहेत. मी बघतोय अनेकजण त्यांच्या गाडीतून पाइपने पेट्रोल काढून ते कॅनमध्ये भरत आहेत. त्यांच्यामुळे आमच्यासारख्या वयस्करांना दिवसभर उन्हातान्हाच थांबावं लागत आहे.

पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांनी या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. एका कर्मचाऱ्याने सांगितले की, "इंधनाचा पुरवठा सुरू आहे, पण लोक घाबरून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यामुळे साठा पटकन संपतो आणि पंप बंद करावे लागतात." नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि संताप स्पष्टपणे दिसून येत आहे. एका वाहनधारकाने प्रतिक्रिया देताना म्हटले, सरकारने वेळेवर स्पष्ट माहिती दिली असती तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती." तर दुसऱ्या नागरिकाने सांगितले, "उद्याची खात्री नाही, म्हणून आजच इंधन भरून घेतोय." इंधन गोंधळाचा फटका पाणीपुरवठ्यालाही बसला आहे. बीड बायपास परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, डिझेल न मिळाल्याने अनेक टँकरच्या फेऱ्या विस्कळीत झाल्या. संभाजीनगर जिल्ह्यात दररोज १९,१३० सिलिंडरचा पुरवठा होत आहे. मात्र, बुकिंगचा आकडा तब्बल ६० हजारांच्या वर गेला आहे. लोकांच्या पॅनिक बुकिंगमुळे यंत्रणेवर मोठा ताण येत असून गरजेनुसार गॅस उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यासंदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी एक आदेशही जारी केला आहे. त्यांनी माहिती दिली आहे की, गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर इंधन टंचाईबाबत अफवा पसरविल्या जात असल्याने पेट्रोल पंपांवर नागरिकांची अनावश्यक गर्दी होत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी तसेच सर्वांना समान प्रमाणात इंधन मिळावे यासाठी प्रशासनाने इंधन वितरणाचे योग्य नियोजन केले आहे. प्रशासनाने नागरिकांच्या हितासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार, सर्व वाहनांना इंधन मिळावे यासाठी दुचाकी वाहनांना २०० रुपयांपर्यंत आणि चारचाकी वाहनांना २००० रुपयांपर्यंत इंधन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे कोणाचीही गैरसोय होणार नाही.

## माझ्यावरही अघोरी पूजा करण्याचा प्रयत्न केला: चंद्रकांत खैरेंचा खळबळजनक दावा



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रात अशोक खरात प्रकरण चांगलेच चर्चेत आले असून, महिलांसोबतचे अनेक व्हिडिओ आता समोर येताना दिसत आहे. तसेच हा बाबा काळी जादू करायचा, असेही समोर आले असतानाच आता शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी खळबळजनक दावा केला आहे. माझ्यावरही अघोरी पूजा करण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा खैरे यांनी केला आहे.

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अशोक खरातच्या संदर्भात काही आरोप केले होते. देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी त्यांच्याच मित्रपक्षातील काही सहकाऱ्यांनी खरातकडून तंत्र-मंत्र तसेच अघोरी पूजा केली असल्याचा दावा सपकाळ यांनी केला होता. यावरच चंद्रकांत खैरे म्हणाले की, माझ्यावर सुद्धा अघोरी पूजा झाली होती. पण मी इतका धार्मिक आहे, देवभक्त आहे की माझ्यावर अघोरी पूजा करणारा माणूसच मरून गेला. मी मेलो नाही, तोच माणूस मेला, असा गौप्यस्फोट खैरे यांनी केला आहे.

पुढे बोलताना चंद्रकांत खैरे म्हणाले, राजकीय लोक बाबा लोकांकडे जातात. त्यांनी जाऊ नये. साधुसंतांच्या, देवांच्या दारी जाऊन प्रार्थना करावी. बाकीच्या लोकांच्या दारी कधी जाऊ नये. माझा जादूटोणावर अजिबात विश्वास नाही. मी इतका मजबूत आहे की माझ्या पाठीशी देवाची शक्ती आहे. मी अध्यात्मवादी आहे, धार्मिक वृत्तीचा आहे. म्हणून माझ्यावर जादूचे कोणतेही प्रयोग होत नाहीत. माझ्यावर जादूचा प्रयोग करणारा माणूस स्वतःच मेला. कन्नड तालुक्यातील नाचणवेलचा हा माणूस असल्याचीही माहिती खैरे यांनी दिली.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रुवार २७ मार्च २०२६

# रामनवमी निमित्त कै. माधवराव (काका) पाटील यांची १०० वी जयंती मुरुममध्ये उत्साहात साजरी



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** कै. माधवराव पाटील यांनी शिक्षण, सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजातील दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी त्यांनी विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली. समाजकारणाबरोबरच राजकीय क्षेत्रात त्यांनी पारदर्शक व लोकाभिमुख नेतृत्व केले. ग्रामीण भागातील गोरगरीब, होतकरु मुला-मुलींना शिक्षणाची सोय व्हावी या उद्येशाने शैक्षणिक संकुलन उभे करणारे, शेती उद्योगाला चालना देण्याकरिता विठ्ठलसाई साखर कारखान्याची उभारणी करणारे विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष तथा नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष कै. माधवराव (काका) पाटील यांची रामनवमी दिनी १०० वी जयंती मुरुम शहरात विविध ठिकाणी गुरुवारी (ता.२६) रोजी मोठया उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. प्रारंभी कै. माधवराव पाटील यांच्या समाधीस्थळी भाजपचे नेते बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव जाधव, बबनराव बनसोडे, रशिद शेख, मदन पाटील आदिंची प्रमुख उपस्थिती होती. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातील कै. माधवराव पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास भाजपचे नेते बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सादिकमिया काझी, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव, उमरगा जनता बँकेचे व्हाईस चेअरमन अँड. व्ही. एस. आळंगे, कारखान्याचे संचालक दिलीप भालेराव, माणिक राठोड, श्रमजीवी संस्थेचे संचालक मल्लीनाथ दंडगे, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, प्रदीप दिंडेगावे, माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. राम सोलंकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, प्राचार्य डॉ. सदक वली, मुख्याध्यापक उल्हास घुरेघुरे, राजशेखर कोरे, अनुराधा जोशी, व्यंकट घोडके, सैपन शेख, धनराज खोंडे, श्रीपाद कुलकर्णी, कमलाकर मोटे, सच्चिदानंद अंबर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील कै. माधवराव पाटील सार्वजनिक वाचनालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल व नूतन विद्यालय, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, विठ्ठल साई सहकारी साखर कारखाना आदि ठिकाणी जयंती साजरी करण्यात आली. फोटो ओळ : मुरुम, ता. उमरगा येथील पाटील महाविद्यालयात कै. माधवराव पाटील यांच्या जयंती प्रसंगी त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना बसवराज पाटील, बापूराव पाटील, शरण पाटील, सादिकमिया काझी, व्यंकट जाधव, दिलीप गरुड आदि.

# महाराष्ट्रातील इतिहासकार लेखक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : महाराष्ट्राच्या इतिहास संशोधन क्षेत्रातील एक भक्कम स्तंभ, प्रख्यात इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांचे आज दि. २६ मार्च २०२६ रोजी पहाटे दु:खद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या वैचारिक, ऐतिहासिक आणि शैक्षणिक विश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.डॉ. पवार यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात इतिहास संशोधनाला वाहून घेतले. त्यांनी केवळ इतिहास लिहिला नाही, तर तो जिवंत केला—पुराव्यांच्या आधारे, अभ्यासपूर्ण दृष्टिकोनातून आणि समाजाभिमुख विचारातून. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील इतिहास, मराठा साम्राज्याची घडण, सामाजिक बदल, ग्रामीण इतिहास आणि स्थानिक संस्कृती यांचा त्यांनी सखोल अभ्यास करून अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ समाजाला दिले.त्यांची लेखनशैली अभ्यासपूर्ण असली तरी सर्वसामान्य माणसाला समजेल अशी होती. त्यांनी इतिहासाला केवळ राजे-रजवाड्यांपुरता मर्यादित ठेवले नाही, तर सामान्य लोकांच्या जीवनाशी जोडून तो अधिक व्यापक केला. त्यांच्या संशोधनामुळे अनेक ऐतिहासिक गैरसमज दूर झाले आणि सत्य इतिहास समाजासमोर आला.




# सरोश प्राथमिक शाळेत रंगला कविता दिन



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर शहराजवळ असलेल्या मीटमीटा येथील सरोश मराठी प्राथमिक शाळेत नुकतेच कविता दिनाचे औचित्य साधून प्रसिध्द कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी कविता वाचनांचा कार्यक्रम घेतला. या कार्यकमात अय्युब पठाण यांनी प्रारंभी विद्यार्थी यांना बाल कविता चालीवर गाऊन दाखविल्या. त्यानंतर कविता कशी लिहावी याची माहिती दिली. काही विनोदी चारोळ्यांचे सादरीकरण करून मुला-मुलींना भरपूर हसविले. आणि शेवटी सांगितले की, " कविता काय असते? कविता म्हणजेच ज्या कवितेत भावना मोहरून रडते ती कविता चांगली असते. प्रत्येक काळजाचे आभाळ होत नसते तर शब्दांना रक्तांचे अमृत पाजावे लागते ती कविता असते. कथेविषयी सांगितले," ज्या कथेत असती व्यथा ती कथा चागली असते." शेवटी "आई," ही करूणरसातील संगीतमय कविता मधूर आवाजात सादर केली. ही कविता ऐकूण सर्वांचे डोळे पाणावले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रामपाटील एरंडे, तसेच मुख्याध्यापक समीर पठाण शिक्षक अशरफ पठाण, इरफान पठाण, शेख युनूस, इरफान देशमुख यांच्यासह विद्यार्थी व परीसरातील पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुकरुवार २७ मार्च २०२६


## खेळ खेळूया

चला मुलांनो आनंदाने,
खेळ खेळूया जुने सारे.
मोबाईल ठेवा रे बाजूला,
आनंदाचे वाहतील वारे. १

जाणून घेऊया जुने खेळ,
चला आनंद मिळेल खूप.
खेळता खेळता तुझे माझे,
आता बदलून जाईल रूप. २

गोल गोल रिंगण मारून,
गोट्या खेळू नेम धरून.
कोई चिंचा खेळू चला,
मातीमध्ये खोल पुरून. ३


शारीरिक क्षमता वाढेल,
वाकून कुरघोडी खेळताना.
शिवना पाणी खेळू चला,
शिवता शिवता पळताना. ४

अबक दुबक तिबक मोजून,
गिल्ली दांडू खेळ खेळू चला.
अबक दुबक मोजता मोजता,
मोजण्याची शिकून घेऊ कला. ५



**- नागेश रामलू बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर.**
**मो.नं.९७६३२८३७०४**

# इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांना मराठवाडा इतिहास परिषदेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र इतिहासाचे आधारवड डॉ.जयसिंगराव पवार यांना मराठवाडा इतिहास परिषद अध्यक्ष डॉ. गोपाल बच्छीरे व सर्व पदाधिकारी यांच्याकडून श्रद्धांजली अर्पण करून अखेरचा निरोप देण्यात आला.डॉ. गनी पटेल यांच्या कार्यालयात ही शोकसभा घेण्यात आली याप्रसंगी डॉ. गोपाल बच्छीरे यांनी वैकुंठवासी डॉ. जयसिंगराव पवार यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला "इतिहास हा राष्ट्राचा आणि समाजाचा प्रबोधक असतो" हे ब्रीदवाक्य घेऊन गेली तब्बल पाच दशके मराठ्यांच्या इतिहासाची सेवा करणारे डॉ. जयसिंगराव पवार यांचे आज निधन झाले. गेली सलग पन्नास वर्ष पवार सरांचे महाराष्ट्र इतिहास लेखणाचे कार्य सूरू होते. छत्रपती संभाजी महाराज स्मारक ग्रंथाच्या दर्जेदार कामापासून ते महाराणी ताराबाई साहेब, शिवपुत्र राजाराम महाराज, सेनापती संताजी घोरपडे अशा मराठ्यांच्या इतिहासातील महान पराक्रमी पण इतिसकारांनी दखल न घेतलेल्या अनेक चरित्रांवर पवार सरांनी आपल्या संशोधकिय लेखणीतून प्रकाश टाकला. एक प्रकारे ही विस्मरणात गेलेली चरित्रे नव्याने उजेडात आणली.राजर्षी शाहू स्मारक ग्रंथाचे लेखन संपादन हे इतिहास मांडणीचा मानदंड ठरावा. शाहू महाराजांचे जीवन व कार्य लोकांपर्यंत पोहोचवणे हे पवार सरांनी आपले लाईफ मिशन मानले होते. शाहू महाराजांच्या जीवनावरील फक्त ग्रंथाची निर्मिती केली नाही तर हा ग्रंथ भारतातील आणि विदेशातील अनेक भाषांमध्ये प्रकाशित करून शाहू चरित्र सर्वदूर पोहोचावे म्हणून प्रयत्न केलेले पवार सर हे पहिली व्यक्ती ही आहेत.महाराष्ट्र इतिहासाची अशी सेवा करत असतानाच सरांनी राजर्षी शाहू स्मारक भावन सारख्या एका महत्त्वाच्या सांस्कृतिक केंद्राच्या संचालक पदापासून ते शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राच्या संचालक पदापर्यंतची धुरा गेली अनेक वर्ष आपल्या खांद्यावर समर्थपणे पेलली होती . इतिहासाचा अभ्यास करून इच्छिणाऱ्या तरुणांना, व्यक्तींना मार्गदर्शन करून इतिहास लेखन कसे करावे, इतिहास संशोधनाच्या पायऱ्या कशा चढाव्यात याचे योग्य मार्गदर्शन केले होते. जयसिंगराव पवार सर हे मराठ्यांचा सत्य इतिहास मांडू इच्छिणाऱ्या अनेक अभ्यासकांचे आधारवड होते. आज तो आधारवड कोसळला आहेयाप्रसंगी डॉ. गणी पटेल, डॉ. शरद गावंडे, डॉ.राजेश करपे, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. विनोद बोरसे, डॉ. टी आर पाटील, डॉ. संजय पाईकराव, यांच्यासह मोठ्या संख्येने इतिहास अभ्यासक उपस्थित होते.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# बुलढाणा जिल्ह्यातील शेती कामे ठप्प होण्याच्या मार्गावर, इंधन टंचाईच्या अफवांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण...





**बुलढाणा (महेश मुंढे) :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाई होणार असल्याच्या अफवानी जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण केले आहे, विशेषतः किनगाव राजा परिसरात या अफवांचा मोठा परिणाम दिसून आला असून येथील पेट्रोल पंपावर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. संभाव्य इंधन टंचाई च्या भीतीने वाहनधारकांनी पेट्रोल आणि डिझेलचा साठा करण्यासाठी धाव घेतल्याने किनगाव राज्यातील पेट्रोल पंपावर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अचानक वाढलेल्या गर्दीमुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी स्थानिक प्रशासनाला हस्तक्षेप करावा लागला , नागरिकांमध्ये असलेली भीती आणि अफवांमुळे आवश्यकतेपेक्षा जास्त इंधन खरेदी करण्याची प्रवृत्ती वाढतांना दिसत आहे, दरम्यान या परिस्थितीचा थेट फटका शेती क्षेत्राला बसला आहे इंधनाच्या संभाव्य टंचाईमुळे अनेक शेतकऱ्यांची शेतीची कामे ठप्प झाली आहेत, ट्रॅक्टर आणि हार्वेस्टर आणि इतर यंत्रसामग्री साठी लागणाऱ्या डिझेलचा पुरवठा खंडित होईल या भीतीने शेतकरी चिंतेत आहेत. त्यामुळे रब्बी हंगामातील कामांवर याचा मोठा परिणाम होणार आहे असे चित्र दिसत आहे. दरम्यान पेट्रोल पंप मालक व स्थानिक प्रशासनाने अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे, इंधन पुरवठा सुरळीत असल्याचे स्पष्ट करत अनावश्यक साठेबाजी टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. व सदर परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून नागरिकांनी संयम राखून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात हार्वेस्टर मालक संदीप काळूसे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की " इंधन टंचाईच्या अफवेने डिझेल मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे, आम्ही हार्वेस्टर चालवण्यासाठी पूर्णपणे डिझेलवर अवलंबून आहोत सध्या पेट्रोल पंप वर मोठ्या रांगा लागल्याने वेळ वाया जात आहे आणि कामे वेळेत पूर्ण करणे कठीण झाले आहे, ही परिस्थिती अशीच राहिली तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. "

## मी सूर्यफूल

मी आहे सूर्यफूल
सूर्यासारखा आकार
शेतकरीदादाचे स्वप्न
करतो मी साकार

दिसायला मोठा गोल
सुरेख माझी काया
आतमध्ये दडल्यात
काळया काळया बिया

बियांपासून बनतो
पोषक पशू आहार
निसर्गाची शोभा वाढवी
पिवळे धमक शिवार

तेलात आहेत
जीवनसत्व भरपूर
विविध आजाराला
ठेवती मी दूर

सूर्याकडे बघून
हसून छान खुलतो
हवेची झुळूक येता
मनमुराद डुलतो



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुकरुवार २७ मार्च २०२६


## अज्ञात वयस्कर महिलेचा मृत्यूदेह आढळले, घातपात की अपघात ?

**दौलताबाद (आवेद अहमद) :** अज्ञात वयस्कर महिलेचा मृत्यूदेह आढळलेघातपात की अपघात संशय ?दि २६ गुरुवारी सकाळी धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग वर माळीवाडा आसेगाव महामार्गावरील पाण्याचा एका पुलाखाली एक ५५ते ६० वर्षीय महिला बेशुद्ध अवस्थेत पडलेली असल्याची माहिती गुराखी संतोष कांबळे यांनी सकाळी आठ वाजता आसेगाव चे पोलीस पाटील बाळू कांबळे यांना दिली कांबळे यांनी दौलताबाद पोलिसांना ही माहिती दिली माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रेखा लोंढे,उपनिरीक्षक वसंत शेळके ,संदीप वाघ,ज्ञानेश्वर कोळी,खुशाल पाटील,रावसाहेब ठिलारे ,कपिल सातदिवे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी करून श्वान पथक, फॉरणेंसिक पथक,व ठसे तज्ञांच्या मदतीने मृत्यु अवस्थेत असलेल्या महिलेचे शव घाटी रुग्णालयात शवागरगृहात ठेवण्यात आलेमहिला ही साधारण ५५ ते ६० वयोगटातील असून अंगात गुलाबी रंगाची साडी व ब्लाउज नेसलेली आहे,उजव्या पायात काळा दोरा आहेतिच्या डोक्याला उजव्या बाजूला कानातून रक्तश्राव झालेले असल्याचे दिसून आले आहेयांच्यवरून हा अपघात की घातपात असा पोलिसांसमोर प्रश निर्माण झाला आहेवैद्यकीय अहवाल आल्यानंतर या प्रश्नाचे उलगडा होईल महिलेच्या उजव्या हातात जप करण्याची माळ आहे कदाचित ही महिला वारकरी असल्याचे दिसून येतेसदर घटनेच्या ठिकाणी रस्त्याचे काम सुरू आहे दि २५ बुधवार संध्याकाळी सहा वाजेपर्यंत रस्त्याचे काम सुरू होते तो पर्यंत तिथं अस काही दिसून न आल्याचे कामावरील मजुरांनी सांगितले आहेकदाचित ही घटना रात्री उशिरा घडली असल्याचे पोलिसांचा अंदाज आहेघटनास्थळी परिमंडळ ०१ चे उपायुक्त पंकज अतुलकर यांनी भेट देऊन पाहणी केली आहेसदर महिले बाबत काही माहिती असल्यास दौलताबाद पोलीस यांच्याशी संपर्क साधण्याचा आव्हान पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे

## मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम बीडमध्ये २८ व २९ मार्च रोजी विशेष कॅम्पचे आयोजन

**बीड (भगवंत पाळवदे) :** आगामी विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या (SIR) पार्श्वभूमीवर मतदार यादीतील मतदारांचे २००५ च्या यादीशी मॅपिंग करण्यासाठी हे विशेष कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत.या कॅम्पसाठी ४५७ बीएलओना उपस्थिती अनिवार्य राहणार आहे.बीड तालुक्यातील २३०-बीड विधानसभा मतदारसंघ (३४५ बीएलओ), २२८-गेवराई (७१ बीएलओ) आणि २३२-केज (४१ बीएलओ) अशा एकूण ४५७ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या (BLO) नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्त मतदान केंद्रावर कार्यालयीन वेळेत (सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५) उपस्थित राहून खालील कामे पूर्ण करावयाची आहेत.मतदार यादी मॅपिंग: सन २०२४ च्या मतदारयादीची २००५ च्या यादीशी पडताळणी करणे. तांत्रिक पडताळणी: DSE आणि PSE पडताळणीची कामे पूर्ण करणे. फोटो दुरुस्ती: मतदार ओळखपत्रावरील अस्पष्ट (Blur) फोटो बदलणे. संपर्क मोहीम: 'Book A Call To BLO' अंतर्गत प्रलंबित असलेली कामे मार्गी लावणेही सर्व कामे दिलेल्या वेळेत पूर्ण करावीत आणि कोणीही गैरहजर राहणार नाही याची दक्षता घ्यावी असे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड यांनी कळविले आहे.

## निधन वार्ता



**माळीवाडा :** ईदगाह येथिल गौसिया बी मकसूद अली बेग वय ७५ वर्ष यांचे दि २५ बुधवार रोजी निधन झाले आहेत्यांचे दफनविधी बाबू चिस्ती यांच्या दर्गा माळी वाडा येथे करण्यात आले आहेत्यांच्या पश्चात तीन मुले,दोन मुली नातवंडे असा परिवार आहे


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002